Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII ISSUE- V MAY 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# महत्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचा उदय आणि विकास

**प्रा. देवराव नामदेव सोनकांबळे**
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय , कळे
ता : पन्हाळा जिल्हा : कोल्हापूर

## प्रस्तावना ,

स्वातंत्र्योतर काळात मागासवर्गीय समाजाचा सर्वांगीण विकास करण्याच्या ध्ययाने प्रेयारीत होऊन तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू याने सर्वप्रथम भारतीय राज्येघटनेतील कलम ३४० नुसार समाजिक न्याय विभागाची स्थापना करण्यात आली . या विभागांतर्गत देशातील समाजिक व आर्थिक दृष्ट्या मागास समाजाचा सर्वांगीण अभ्यास करण्याकरिता श्री . काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली २९ जानेवारी १९५३ रोजी मागासवर्ग आयोग समिती नेमण्यात आली . या समितेने आपला अहवाल १९५५ मध्ये सरकारला सादर केला . परंतु केंद्र सरकारने या समितीच्या शिफारसी स्वीकारले नाहीत . तर सरकारने समाजिक न्याय विभागांतर्गत देशातील राज्यास्थरावर मागास समाजाचा समाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सास्कृतिक ईत्यादि क्षेत्राचा विकास करण्याचा दृष्टीकोण समोर ठेऊन राज्येस्तरावर निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. म्हणून देशातील प्रत्येक घटक राज्यात समाजिक न्याय विभागांतर्गत ( अनुसूचित जाती व जमाती , अनुसूचित भटक्या विमुक्त जाती व जमाती ) राज्यातील मागास समाजाचा सर्वांगीण विकास करण्याकरिता

राज्येघटनेतील मार्गदर्शक तत्वास अनुसरून विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यात येत असून देखील मागास समाजाचा समाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास अपेक्षे इतका झालेला नाही , असे विविध अभ्यासपूर्ण समित्यांनी केलेल्या निरीक्षण अहवालातून लक्षात आले आहे . म्हणून राज्ये सरकारने राज्यातील मागास समाजाचा शाश्वत विकासाची परिपूर्तता करण्याकरीता विविध महामंडळे स्थापण करण्याचा निर्णय घेतला आहे.

यास अनुसरून २ फेब्रुवारी १९७८ रोजी राज्याचे मुख्यमंत्री वसंतदादा बंडोजी पाटील याने १९५६ च्या कंपनी अधिनियमन कायद्यास अनुसरून महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ स्थापण करण्याचा निर्णय घेतला आहे. या महामंडळाच्या कार्याची प्रत्यक्षात सुरुवात १० जुलै, १९७८ रोजी झाली . याच धर्तीवर राज्यात लोकशाहीर अण्णभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ , संत रोहोदास चार्मउद्योग व चर्मकार समाज आर्थिक विकास महामंडळ, वसंतराव नाईक भटक्या विमुक्त जाती व जमाती विकास महामंडळ, शबरी आदिवासी विकास महामंडळ , मौलाना आजाद विकास महामंडळ, अन्‍नसाहेब पाटील विकास महामंडळ , महाराष्ट्रय राज्य दिव्यांग विकास महामंडळ , महिला आर्थिक विकास महामंडळ व इतर आर्थिक दृष्ट्या मागासवर्ग विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली .

## महामंडळाचा उदय :

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय समाजव्यवस्थेत सर्वत्र समाजिक, आर्थिक, धार्मिक , राजकीय व शैक्षणिक इत्यादी क्षेत्रात विषमता पसरलेली होती. परिणामतः समाजात रूढी , परंपरा ,अंद्श्र्धा व दैववाद यांचा प्रभाव समाजात सर्वत्र पसरलेला दिसून येत होता. ही समाजिक विषमता उच्चार्नातील समाजानी कनिष्ठा वर्णातील समाजावर

निर्दयपणे लादलेली होती. म्हणून या कनिष्ठ वर्णातील लोकस्मुहात बहुतांश पणे समाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय व शैक्षणिक विषमता मोठ्या प्रमाणात दिसत होती. अशा प्रकारच्या तत्कालीन समाजव्यवस्थेच्या विरोधात देशातील काही समाजसुधारकांनी आपल्या परखड वाणी व साहित्याच्या विचारातून उठाव केला. त्यात फुले , शाहू व आंबेडकर यांनी प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या विरोधात मत मांडून मागासलेल्या समाजाना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला. तर यात राजश्री शाहू महाराजांनी आपल्या राज्यात मागास समाजाकरिता सरकारी नोकरीत ५० % जागा राखीव ठेवण्यासाठी कायदा केला. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या परखड वाणी व विचाराने मागास समाजाला संघटीत करून प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या विरोधात बंड करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपल्या आयुषाच्या शेवटपर्यंत प्रयत्न केला. तसेच स्वातंत्र्योत्तर काळात मागास समाजाला समाजिक व आर्थिक न्याय मिळवून देण्यासाठी भारतीय राज्यघटनेत देशातील सर्व लोकांना मुलभूत हाक व त्याच बरोबर समाजात समाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करण्याकरिता काही मार्गदर्शक तत्वे दिली आहेत. या मार्गदर्शक तत्वाचा आधार घेऊन देशातील तत्कालीन सरकारने समाजिक न्याय विभागाची स्थपना करून १९५६ च्या कंपनी आदिनियमन कायद्यानुसार २ फेब्रुवारी,१९७८ रोजी महामंडळ निर्मितीचा निर्णय घेण्यात आला . निर्णय क्रमांक एस . सी . डब्ल्यू १०७७ /५६०२६- डी- ७ या आदेशानुसार राज्यात दिनांक १० जुलै, १९७८ रोजी महामंडळाचे प्रत्यक्षात कार्ये सुरे झाले.

## महामंडळाचा विकास :

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे मुख्य कार्यालय मुंबई येथे असून , त्याचे विभागीय कार्यालय मुंबई , पुणे , नाशिक , औरंगाबाद , अमरावती व नागपूर येथे आहेत . तर प्रत्येक जिल्ह्याच्य ठिकाणी जिल्हा कार्यालय असून या कार्यालय मार्फत प्रत्यक्षात प्राथमिक स्तरावर काम केले जाते .

## विभागीय कार्यालय व त्याविभागातील जिल्हा कार्यालय पुढील प्रमाणे दर्शविण्यात आली आहेत .

**१) मुंबई विभागीय कार्यालय -** मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे , रायगड, रत्नागिरी , सिंधुदुर्ग व पालघर.

या विभागात या जिल्ह्यांचा समावेश आहे.

**२) पुणे विभागीय कार्यालय -** पुणे , सातारा , सांगली, सोलापूर व कोल्हापूर. या विभागात या जिल्ह्यांचा समावेश आहे.

**३) नाशिक विभागीय कार्यालय -** नाशिक , धुळे , जळगाव, अहमदनगर व नंदुरबार. या विभागात या जिल्ह्यांचा समावेश आहे .

**४) औरंगाबाद विभागीय कार्यालय -** औरंगाबाद , जालना, परभणी ,नांदेड, हिंगोली, लातूर , बीड व उस्मानाबाद या विभागात या जिल्ह्यांचा समावेश आहे.

**५) अमरावती विभागीय कार्यालय -** अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वाशीम. या विभागात या जिल्ह्यांचा समावेश आहे.

**६) नागपूर विभागीय कार्यालय -** नागपूर, भंडारा,चंद्रपूर , गडचिरोली , वर्धा व गोंदिया . या विभागात या जिल्ह्यांचा समावेश आहे.

## महामंडळाचे भाग भांडवल :

सध्या महामंडळाचे भाग भांडवल एकूण ५०० कोटी रुपयाचे असून राज्य व केंद्र शासनाचे प्रमाण ५१ : ४९ इतके आहे . आजपर्यंत केंदें शासनाकडून प्राप्त झालेले भाग भांडवल ६४.०७ कोटी रुपये इतके आहे. एकंदरीत केंद्र व राज्य शासनाकडून महामंडळाकडे प्राप्त झालेले एकूण भांडवल ६३२.६४ कोटी रुपये आहे. म्हणजेच महामंडळाच्या एकूण भाग भांडवलात केंद्र पेक्षा

राज्य शासन जास्त गुंतवणूक केली आहे. भाग भांडवलाची विभागणी १० हजार भाग मध्ये झाली आहे. म्हणजेच प्रत्येक भागाला ५०० रुपये याप्रमाणे मिळतात. जो व्यक्ती महामंडळाची माहिती पुस्तिका विकत घेईल, तोच व्यक्ती महामंडळाचे भाग विकत घेईल .

प्रत्यक्षात केंद्र आणि राज्य शासन हे महामंडळाचे व्यक्ती नसून केवळ भागधारक आहेत .

## महामंडळाची कामगिरी :

प्रत्यक्षात महामंडळाचे कार्य जिल्हा कार्यालय मार्फत चालते. या कार्लाया मार्फत अनुसूचित जाती ( महार , नौव-बौद्ध, बुरुड , खाटिक, भंगी , म्हेत्तर, हिंदू भंगी , हिंदू खाटिक , व इतर सबंदित असलेल्या पोट जाती ) या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल व गरजू अशा पात्र लाभाधारकाचा शोध घेऊन महामंडळाच्या विविध योजनेचा लाभ त्यांना प्राप्त करून दिला जातो . राज्यात आजपर्यंत १०,५०,००० पेक्षा जास्त लाभधारकांना महामंडळाने ९६,८२० कोटी रुपयाचे अर्थसाह्य वितरीत केले आहे.

## महामंडळाच्या विविध योजना :

**१) ५० % अनुदान योजना :** या योजने अंतर्गत राज्यातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल व गरजू अशा पात्र लाभधारकांना या योजनेचा लाभ दिला जातो . या योजनेत महामंडळाकडून जास्तीत जास्त १०,००० रु . पर्यंतचे अनुदान दिले जाते. तर राष्ट्रीय , सहकारी अथवा नागरी बँकेकडून लाभधारकांना जास्तीत जास्त ४०,००० रु . पर्यंतचे कर्ज दिले जाते. लाभाधारकाकडून कसल्याही प्रकारचे तारण नसताना सुधा कर्ज वितरीत केले जाते . या कर्जाची सर्वस्वी जबाबदारी महामंडळाकडून स्वीकारली जाते . म्हणून मागास समाजातील बेरोजगार लोकांना कर्ज देण्यासाठी बँका पुढे आल्या आहेत . परिणामतः मागास समाजातील बेरोजगारांना स्वरोजगार प्राप्त झाला आहे .

परिणामतः या योजनेचा लाभ राज्यातील गरजू व पात्र लाभधारकांनाच होईल असे या योजनेच्या हेतू आहे .

**२) बीज भांडवल योजना :** या योजने अंतर्गत आर्थिक दृष्ट्या दुर्बल व गरजू अशा पात्र लाभधारकांना या योजनेचा लाभ दिला जातो . या योजनेत महामंडळाकडून जास्तीत जास्त १०,००० रु . पर्यंत अनुदान दिला जातो .

तसेच या योजनेत लाभधारकांना जास्तीत जास्त ५०,००१ रु. ते ५,००००० लाख रुपया पर्यंत कर्ज दिला जातो बँकांनी एकूण मंजूर केलेल्या कर्जापैकी २० % कर्ज आणि त्यात १०,००० रुपये अनुदानाचा समावेश असतो . या कर्जावर महामंडळाचा द. सा. द. शे . ४ रुपये प्रमाणे व्याजदर आकारला जातो व लाभाधारकांचा एकूण कर्जापैकी ५ % हिसा हा लाभधारकांचा असावा असे अनिवार्य आहे . तर उर्वरित रकमेवर बँकांनी चालू व्याजदरानुसार जो व्याजदर आकारला जातो तो व्याजदर लाभधारकांना मान्या असेल . या योजने अंतर्गत मागास समाजातील सुशिक्षित बेरोजगारांना स्वरोजगार प्राप्तीसाठी अर्थसह्ये उपलब्ध झाले असून त्यांचा आर्थिक व समाजिक विकास होइल . अशा प्रकारचे गृहीत ही योजना चालू करण्याच्या पाठीमागे आहे .

**३) अस्वच्छ सफाई कामगार व त्यांच्या कुटुंबियांचा विकास योजना :** या योजने अंतर्गत राज्यातील भंगी व हिंदू भंगी या जातीमधील आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या गरजू व पात्र व्यक्तीचा शाश्वत विकास करण्याच्या दृष्टीने ही योजना राज्यात कार्न्वित करण्यात आली आहे . या योजने अंतर्गत लाभधारकांना ५० हजार रुपयापर्यंत कर्ज दिले जाते . यात महामंडळा मार्फत ७५०० रुपये बीज भांडवल व १२५०० रु. अर्थसाह्य देण्यात येते . तसेच या योजनेत राष्ट्रीय महामंडळा मार्फत १०.०० ते १५.०० लाख रुपयापर्यंत कर्ज सुविधा उपलब्ध करून दिली जाते

परंतु सबंधित व्यवसाय हा अस्वच्छ तेवर प्रतिबद्ध घालणारा अथवा निर्जंतुकीकरण करणारा असावा असे अनिवार्य आहे .

**४) राष्ट्रीय अनुसूचित जाती व वित्त् विकास महामंडळ ( NSFDC ) :** या महामंडळाच्या विविध योजना राज्यात महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळा मार्फत राबविल्या जातात . या योजने मार्फत लाभधारकांना ५०,००० रु. ते ५,००,००० रु. पर्यंत महामंडळाकडून कर्ज उपलब्द करून दिला जातो. परंतु या योजनेत विविध लाभधारकांना अनुदान मात्र महामंडळाकडून दिला जातो . तसेच बीज भांडवलाचे कर्ज महामंडळाकडून दिले जाते.

बीज भांडवल योजनेत दिलेल्या कर्जावर व्याजदर द. सा .द. शे. ४ रु. याप्रमाणे आकारला जातो. परंतु या राष्ट्रीय महामंडळाकडून देण्यात येत असलेल्या कर्जावर व्याज मात्र अतिशय अल्प प्रमाणात असतो . द.सा. द. शे .३, ४, ५ रुपये या प्रमाणे व्याज दर आकारला जातो . यात महिलांना मात्र व्याजदरात विशेष सवलत दिली जाते.

**५) राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त विकास व महामंडळ ( NSKFDC ) :** या देशात शेकडो वर्षापासून समाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास समाजाचा सर्वांगीण शाश्वत विकास करण्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन केंद्र सरकारने देशात सन १९९७ मध्ये राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त विकास व महामंडळाची स्थापना केली आहे.

या महामंडळा मार्फत राष्ट्रीय सफाई कर्मचारी यांच्या कुठूभातील १८ वर्ष पूर्ण झालेल्या मुला व मुलीना या व्यवसायात येऊनये म्हणून त्यांचा कुठुबियांचा विकास करण्याच्या दृष्टीने समाजिक न्याय व मनुष्य विकास मंत्रालय,भारत सरकार द्वारा आयोजित महामंडळा मार्फत राबविण्यात येते . या योजनेत राज्यातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या मागास समाजातील गरजू व पात्र लाभधारकांना स्वयरोजगाराकरिता ५०,००० रु. ते १०,००,००० रु. पर्यंत कर्ज उपलब्द करून दिला जातो . या कर्जावर द. सा .द. शे . व्याजदर अतिशय अल्प प्रमाणात आकारला जातो . विशेस म्हणजे महिलाकरिता व्याजदर पुरुषाच्या तुलनेत कमी आकारला जातो . परंतु व्यवसाय मात्र अस्वचछ निर्जंतुकीकरण करणारा असावा असे बंधन घालण्यात आले आहे .

**निष्कर्ष :**

स्वातंत्र्योत्तर काळात राज्यात अनुसूचित जाती व जमाती तसेच भटक्या विमुक्त जाती व जमाती या प्रवर्गातील समाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास समाजातील लोकांचा शाश्वत विकास करण्याच्या ध्येयाने समाजिक न्याय विभाग अंतर्गत कल्याणकारी विविध योजना राबऊन सुध्दा या समाजाचा विकास अपेक्षेइतका झाला नाही. म्हणून राज्यात १९५६ च्या कंपनी अधिनिअमन कात्यास अनुसरून महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या महामंडळा मार्फत राज्यातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या गरजू व पात्र अशा लोकांचा विकास करण्याचा संकल्प या महामंडळा मार्फत करण्यात आला आहे .

**संदर्भग्रंथ :**

१) **महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाचा अभ्यास . लेखक :** महाजन आणि कांबळे

२) **शासकीय योजनांचा खजिना . लेखक : डॉ. पुरुषोत्तम भापकर**

३) **“ यशोगाथा “** महात्मा फुले मागासवर्ग **विकास महामंडळ , मर्यादित मुंबई . महराष्ट्र शासनाचा उपक्रम**

४ ) www.maharashtra.gov.in

५ ) mpbcdc.maharashtra.gov.in